मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये घरगणना मोहीम सुरू!

## पिंपरी-चिंचवड शहरात जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यांतर्गत घरयादी व घरगणनेच्या मोहिमेला सुरुवात झाली.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यांतर्गत घरयादी व घरगणनेच्या मोहिमेला बुधवारपासून सुरुवात झाली. त्यासाठी महापालिकेने सहा हजार ७०२ पर्यवेक्षक व प्रगणक नेमले आहेत. ही मोहीम १४ जूनपर्यंत चालणार आहे.

महापालिकेने या मोहिमेसाठी महापालिका व खासगी शाळेचे शिक्षक, तसेच महापालिकेचे कर्मचारी असे तब्बल सहा हजार ७०२ कर्मचारी नेमले आहेत. त्यात महापालिका शाळा व 'आयटीआय'चे एकूण पाच हजार ५०२ शिक्षक आहेत. महापालिकेच्या विविध विभागांचे एक हजार ४०० कर्मचारी आहेत. एक प्रगणक २०० घरांची मोजणी करणार आहे, तर एका पर्यवेक्षकाकडे तीन प्रगणकांचे नियंत्रण असणार आहे.

प्रगणकांनी आपल्या मोबाइलमध्ये जनगणनेचे ॲप शनिवारी डाउनलोड केले. दुसऱ्या दिवशी लॉग-इन करून नेमून दिलेल्या परिसराचा अचूक नकाशा तपासून घेतला. सोमवारी परिसरातील घरांचा कच्चा नकाशा तयार करण्यात आला. प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती नोंदविण्यास बुधवारपासून सुरुवात झाली. दोनशेपैकी २५ मेपर्यंत ४० टक्के, ३० मेपर्यंत ७० टक्के आणि ५ जूनपर्यंत ९५ टक्के नोंदणी पूर्ण करण्याचे वेळापत्रक आहे. उर्वरित दिवसांत ज्या घरी लोक भेटले नाहीत, त्या घरांना भेट दिली जाणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रत्येक नागरिकाने ही आपली जबाबदारी समजून प्रामाणिक व अचूक माहिती देऊन या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. जनगणनेसाठी संकलित केली जाणारी सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय राखली जाते. ती केवळ शासकीय नियोजनासाठीच वापरली जाते. नागरिकांनी कोणतीही शंका न बाळगता विश्वासाने व निःसंकोचपणे योग्य माहिती द्यावी, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी केले.

### कोणती माहिती विचारणार?

» घराची माहिती, इमारत क्रमांक, मजला, घराचा प्रकार, कोणते धान्य वापरले जाते, मोबाइल क्रमांक, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग व जात, घर स्वतःचे की भाड्याचे, खोल्यांची संख्या, घरात राहत असलेल्या विवाहित जोडप्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचा स्रोत, प्रकाशव्यवस्था, शौचालय, स्वयंपाकघर व गॅसजोडणी, रेडिओ, दूरचित्रवाहिनी, इंटरनेट, संगणक किंवा लॅपटॉप, दूरध्वनी, मोबाइल, दुचाकी किंवा चारचाकी वाहन आहे का, आदी माहिती नोंदवली जाणार आहे.

# दिवाळीपूर्वी पूर्ण होणार 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'!

## उर्वरित कामासाठी स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारणे साकारतेय अतिभव्य शंभूसृष्टी



**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जगातील सर्वात उंच स्मारक 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' प्रकल्पाच्या कामाला आता अधिक गती मिळणार आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत स्मारकाचे काम दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले.

या प्रकल्पासाठी पालिकेतील सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्यासाठी अतिरिक्त आयुक्त-१ विक्रांत बगाडे यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच स्मारकाच्या उर्वरित कामासाठी 'टाईम बाउंड ॲक्शन प्लॅन' तयार करण्याचे आदेश देण्यात आले असून, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही आयुक्तांनी दिली.

मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे ही शंभूसृष्टी उभारली जात आहे. यावेळी बैठकीत स्मारकाचे प्रवेशद्वार ऐतिहासिक स्वरूपात उभारण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाला साजेसं भव्य, प्रेरणादायी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी स्फूर्तीस्थळ ठरणारं स्मारक पिंपरी-चिंचवडमध्ये उभारलं जात असल्याने जगभरातील शिव-शंभूप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या बैठकीला अतिरिक्त आयुक्त-२ तृप्ती सांडभोर, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, माणिक चव्हाण (विद्युत), कार्यकारी अभियंता नरोटे, सल्लागार तसेच ठेकेदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करणारा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारा ठरणार आहे.

> "धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि हिंदवी स्वराज्यासाठी दिलेले बलिदान आगामी पिढ्यांपर्यंत पोहोचावे, हीच 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' उभारण्यामागची प्रेरणा आहे. मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे साकारत असलेले हे स्मारक केवळ शिल्प नसून, तमाम शिव-शंभू प्रेमींसाठी प्रेरणा, स्वाभिमान आणि राष्ट्रभक्तीचे स्फूर्तीस्थळ ठरेल. दिवाळीपूर्वी शंभूसृष्टीचे काम पूर्ण करावे, अशी सूचना प्रशासनाला केली आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

# ‘पवने’चे पाणी पिण्याअयोग्य, बंदिस्त जलवाहिनीबाबत तोडगा काढा

## खासदार श्रीरंग बारणे यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे, आजी-माजी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन तोडगा काढण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासाठी पाणी उचलण्यात येत असलेल्या पवना नदीमध्ये मैलामिश्रित, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. जनावारांचे मांसही नदीपात्रात आढळत आहे. नदीतील पाणी अतिशय दूषित असून पिण्यायोग्य नसल्याचा रिपोर्ट प्रयोगशाळेने दिला आहे. हे पाणी पिल्याने नागरिकांना विविध आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागणे अतिशय आवश्यक आहे. याबाबत स्थानिक नागरिक, आजी-माजी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन तोडगा काढण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्य सरकारकडे केली आहे.



याबाबत खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. शहरातील पाण्याची परिस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली. गेल्या काही वर्षांपासून रखडलेला पवना बंदिस्त प्रकल्प जलवाहिनी मार्गी लावण्यासाठी सर्वपक्षीय बैठक घेण्याची विनंती केली आहे. मावळातील स्थानिक नागरिक, शेतकरी यांचे काही प्रश्न आहेत. ते जाणून घ्यावेत. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी, आंदोलक, विविध संघटनांनाबरोबर संयुक्त बैठक घेऊन मार्ग काढावा, असे खासदार बारणे म्हणाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांनाही याबाबतचे निवेदन दिले आहे

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३२ लाखांवर पोहोचली आहे. शहर चारही बाजूने विस्तारत असून झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येला पाणी अपुरे पडत आहे. महापालिका पवना नदीतील रावेत बंधाऱ्यातून एका दिवसाला ५५० एमएलडी पाणी उचलत आहे. हे पाणी अतिशय अशुद्ध आहे. नदीमध्ये मैलामिश्रित, रसायनमिश्रित पाणी सोडले जाते. जनावारांचे मांसही नदीपात्रात आढळत आहे. त्यामुळे पाणी पिण्यायोग्य राहिले नाही. प्रयोगशाळेनीही तसा अहवाल दिला आहे. पवना नदी मृत झाली आहे.

आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीतील निघोजे बंधाऱ्यातून उचलले जाते. हे पाणीही अतिशय अशुद्ध आहे. दोन्ही नदीतून उचलण्यात येणारे पाणी अशुद्ध आहे. हे पिण्यायोग्य राहिले नाही. हे पाणी शुद्ध करुन नागरिकांना वितरित केले जाते. परंतु, हे पाणी पिल्याने नागरिकांना विविध वैद्यकीय आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे पाणी पिल्याने जीवितहानीही होऊ शकते. नागरिकांच्या भावना तीव्र आहेत. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी योजना करणे अतिशय आवश्यक आहे. त्यासाठी बाधित शेतकरी, आजी-माजी लोकप्रतिनिधी, विविध संघटनांना विश्वासात घ्यावे. चर्चेतून तोडगा काढावा. बंदिस्त जलवाहिनी झाल्यास शुद्ध आणि वाढीव पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे नागरिकांना पुरेसे, मुबलक पाणी उपलब्ध होईल. पाणी टंचाईच्या तक्रारींमध्ये घट होईल, असेही खासदार बारणे म्हणाले.

### बंदिस्त जलवाहिनीअभावी नदीतील पाणी..

**» लवादाने चार महिनेच नदीतून पाणी उचलण्यास परवागी दिली आहे. उर्वरित आठ महिने बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी उचलणे बंधनकारक आहे. परंतु, बंदिस्त जलवाहिनी झाली नाही. त्यामुळे बाराही महिने नदीतूनच पाणी उचलावे लागत आहे. नदीतून उचलण्यात येणारे पाणी अतिशय अशुद्ध असते. त्यामुळे नागरिकांना अशुद्ध पाणीपुरवठा होतो, याकडेही खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधले.**

> **पवना नदीतील पाणी अतिशय अशुद्ध आहे. हे पाणी पिण्यायोग्य नाही. त्यासाठी पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प मार्गी लागणे आवश्यक आहे. सर्वांशी सखोल चर्चा करुन यातून तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहे.**
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार मावळ**

# पिंपरी-चिंचवडमध्ये केमिस्ट संघटनेचा देशव्यापी बंद; ऑनलाइन औषध विक्रीवर बंदीची मागणी

## अडीच हजार औषध दुकाने बंद; ई-फार्मसीवर कठोर कारवाईची मागणी, नागरिकांना मात्र मोठा त्रास

**पिंपरी | प्रतिनिधी**

अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने पुकारलेल्या देशव्यापी बंदला पिंपरी-चिंचवड शहरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व होलसेलर तसेच रिटेल औषध विक्रेते या संपात सहभागी झाले होते. औषध व्यवसायाशी संबंधित गंभीर प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा संप पुकारण्यात आला होता. यामुळे शहरातील जवळपास अडीच हजार औषध दुकाने बंद होती




बेकायदेशीर व अनियंत्रित ऑनलाइन औषध विक्री तात्काळ बंद करण्यात यावी, ई-फार्मसी व ऑनलाइन कंपन्यांकडून डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नियमबाह्य पद्धतीने औषध विक्री होत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, ड्रग्ज अँड कॉस्मेटिक्स अॅक्टचे काटेकोर पालन करण्यात यावे, औषध विक्री क्षेत्रातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी,

औषध विक्रेत्यांवरील अन्यायकारक धोरणे मागे घेऊन लघू व मध्यम केमिस्ट व्यवसायांचे संरक्षण करण्यात यावे, रुग्णांना योग्य मार्गदर्शन, सुरक्षित औषध वितरण व प्रशिक्षित फार्मासिस्टची सेवा उपलब्ध राहावी, यासाठी पारंपरिक औषध विक्री व्यवस्था मजबूत करण्यात यावी आदी मागण्या या वेळी संघटनांच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

### महापौरांचे समर्थन

**» महापौर रवी लांडगे यांनी ऑनलाइन औषध विक्रीस विरोध केला आहे. तसेच, देशव्यापी संपाला पाठिंबा देत फार्मासिस्ट व औषध विक्रेत्यांच्या मागण्यांना त्यांनी समर्थन दर्शविले आहे.**

> **ऑनलाइन औषध विक्रीमुळे रुग्णांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून, स्थानिक फार्मासिस्ट आणि जनऔषध सेवा धोक्यात आली आहे. औषध हे केवळ उत्पादन नसून, तज्ज्ञ फार्मासिस्टच्या मार्गदर्शनाखाली दिली जाणारी आरोग्यसेवा आहे.**
>
> **- विवेक तापकीर, उपाध्यक्ष, केमिस्ट असोसिएशन ऑफ पुणे डिस्ट्रिक्ट**

# पंतप्रधानांच्या आवाहनानंतर पुणे महापालिकेने घेतला निर्णय !

## पंतप्रधानांच्या आवाहनानंतर पुणे महापालिका अधिकाऱ्यांच्या वाहन वापरावर मर्यादा.

**पुणे | प्रतिनिधी**

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनपुरवठा साखळीत अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन पुणे महापालिकेने इंधन वाचविण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. अत्यावश्यक सेवा वगळता महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या वाहन वापरांवर मर्यादा आणण्यात आल्या आहेत.

अमेरिका, इस्त्रायल आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाले आहेत. ही परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत इंधनाचा आवश्यक तेथेच वापर करण्यात यावा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात नागरिकांना केले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आदर्श घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी, अन्य राज्यांच्या मंत्र्यांनीदेखील इंधन बचतीसाठी पुढाकार घेतला आहे. राज्य सरकारने अधिकाऱ्यांनादेखील इंधन बचतीच्या सूचना दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरू झाली. याचा एक भाग म्हणून पुणे महापालिकेनेदेखील इंधन बचतीसाठी पावले उचलली आहेत.

महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी केल्या आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी व्हेईकल डेपोचे उपायुक्त संदीप कदम यांच्यासोबत बैठक घेतली. महापालिकेच्या प्रकल्पांना भेटी देण्यासाठी जाणाऱ्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी शक्यतो एकाच वाहनातून जावे. कामावर येणाऱ्या अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा. महापालिकेच्या ताफ्यात असलेल्या ई-वाहनांचा अधिकाअधिक वापर करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

महापालिकेतील अधिकाऱ्यांनी शक्य असेल त्या बैठका ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात. बैठकीच्या निमित्ताने शहरातील इतर भागात जाण्यासाठी वाहनांचा विनाकारण वापर करू नये, अशा सूचना देखील यावेळी देण्यात आल्या. अत्यावश्यक सेवांसाठीच्या पुरविल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये कुठल्याही पद्धतीने कपात करण्यात येणार नाही. इंधन बचतीसाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना या बैठकीत अतिरिक्त आयुक्त नायर यांनी केल्याचे उपायुक्त संदीप कदम यांनी सांगितले.



### सार्वजनिक वाहतुकीला महापालिकेचे प्रोत्साहन

**» आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन पुणे महापालिकेने इंधन बचतीसाठी महत्त्वाची पावले उचलली आहेत. अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्प पाहणीसाठी शक्यतो एकाच वाहनातून प्रवास करण्यावर भर देण्यात येत आहे. या उपक्रमामुळे इंधन बचतीसोबतच वाहतूक कोंडी कमी करण्यासही मदत होणार आहे. पर्यावरणपूरक आणि जबाबदार प्रशासनाचा संदेश देणाऱ्या या निर्णयाचे शहरातून स्वागत केले जात आहे.**

### ई-वाहनांच्या वापरावर भर

**» पुणे महापालिकेने इंधन बचतीबरोबरच पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य देत ई-वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या ताफ्यातील इलेक्ट्रिक वाहनांचा अधिकाधिक वापर करण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी दिल्या आहेत. इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. यामुळे इंधन खर्चात बचत होण्याबरोबरच कार्बन उत्सर्जनही कमी होणार आहे. भविष्यात शाश्वत आणि हरित प्रशासन उभारण्यासाठी महापालिकेचा हा उपक्रम आदर्श ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.**

### ऑनलाइन बैठकींमुळे होणार इंधन बचत

**» महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकाऱ्यांनी शक्य त्या बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. बैठकीसाठी शहरभर वाहनांचा होणारा अनावश्यक वापर टाळून इंधन बचत करण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच अत्यावश्यक सेवा वगळता वाहन वापर मर्यादित ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे वेळेची बचत, इंधन खर्चात कपात आणि प्रशासनिक कार्यक्षमतेत वाढ होणार आहे. डिजिटल प्रशासन आणि पर्यावरणपूरक कामकाजाचा संगम साधणाऱ्या या उपक्रमाकडे पुणेकर सकारात्मक नजरेने पाहत आहेत.**

# शहरातील अस्वच्छतेवर महापालिकेची कडक भूमिका; ठेकेदारांनाच जबाबदार धरणार

## आयुक्त नवल किशोर राम यांचा निर्णय, सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेची संपूर्ण जबाबदारी आता संबंधित ठेकेदारांवर टाकण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून सार्वजनिक ठिकाणच्या स्वच्छतेची संपूर्ण जबाबदारी आता संबंधित ठेकेदारांवर टाकण्यात आली आहे. अस्वच्छतेबाबत तक्रारी आल्यास संबंधित ठेकेदारांनाच जबाबदार धरण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्व पक्षीय नगरसेवकांनी शहरातील कचरा साठा आणि अस्वच्छतेवरून प्रशासनाला धारेवर धरले होते. केशवनगर येथील प्रत्येकी १७५ टन क्षमतेचे दोन प्रकल्प बंद असल्याने, तसेच सूस येथील नोबल कंपनी आणि रामटेकडी येथील पूना बायो एनर्जी प्रकल्प कमी क्षमतेने सुरू असल्याने शहरात सुमारे ३०० ते ३५० टन अतिरिक्त कचरा साचल्याची कबुली प्रशासनाने दिली होती.

या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी घनकचरा विभाग आणि प्रकल्प चालकांची तातडीची बैठक घेतली. बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, घनकचरा विभाग प्रमुख संतोष वारुळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सार्वजनिक स्वच्छतेसाठी कार्यरत कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर मोकादमांकडून देखरेख ठेवली जात होती. मात्र, तरीही तक्रारी सुरूच असल्याने आता कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीपासून ते संबंधित क्षेत्राच्या स्वच्छतेपर्यंतची सर्व जबाबदारी ठेकेदारांवर सोपविण्यात आली आहे. मोकादमांनी सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत उपस्थितीची नोंद करून त्यानंतर परिसराचे निरीक्षण करावे, तसेच दर पंधरा दिवसांनी अहवाल आयुक्तांकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.



### कचरा प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविणार

**» सूस येथील नोबल प्रकल्प सध्या ४० टन क्षमतेने कार्यरत असून तो १०० टनांपर्यंत वाढविण्यात येणार आहे. रामटेकडी येथील पूना बायो एनर्जी प्रकल्प सध्या १४० टन क्षमतेने चालू असून तो ३०० टनांपर्यंत वाढविण्याचे नियोजन आहे. याशिवाय, कमी क्षमतेने सुरू असलेल्या इतर प्रकल्पांचीही क्षमता वाढविण्यात येणार आहे. येत्या आठवडाभरात सध्या शिल्लक असलेला ३०० टनांहून अधिक कचरा प्रक्रिया करून शहरातील अतिरिक्त कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावला जाईल, असा विश्वास आयुक्त नवल किशोर राम यांनी व्यक्त केला आहे.**

# भामा आसखेड परिसरात 5 कोटींच्या रस्त्याच्या कामावर निकृष्ट दर्जाचा आरोप!

## कोये–धामणे रस्त्याच्या काँक्रिटीकरणात मातीचा वापर; पीएमआरडीएच्या कामावर ग्रामस्थांचा संताप

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील कोये ते धामणे यादरम्यान रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत आहे. रस्त्याच्या साईडपट्ट्या मुरूम टाकून भरण्याऐवजी चक्क माती टाकून भरल्या जात आहेत. या रस्त्यासाठी जवळपास 5 कोटींचा निधी मिळाला आहे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)कडून धामणे फाटा ते कोये, कोहिंडे फाटा ते कडूसगाव, कडूसगाव ते किवळे, भोसे ते वडगाव घेनंद आणि किवळे ते आंबेठाण या पाच रस्त्यांची कामे मंजूर झाली आहेत. रस्त्यांच्या कामासाठी जवळपास 45 कोटींचा निधी मंजूर झाला आहे. धामणे फाटा ते कोयेया दरम्यान पूर्वीच्या डांबरीकरण असलेल्या 1 किमी 800 मीटर लांबीच्या रस्त्यावर सिमेंट काँक्रिटीकरण काम सुरू आहे. यासाठी जवळपास पाच कोटींचा निधी देण्यात आला आहे.

पीएमआरडीए विभागाचे अधिकाऱ्यांनी रस्त्याचे काम संबंधित ठेकेदाराला मिळावे, यासाठी अन्य ठेकेदारांच्या कमी दराने असलेल्या निविदा निकाली काढल्याची चर्चा आहे. संबंधित ठेकेदाराच्या कामांबाबत अनेक गावच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. पूर्वीचा डांबरीकरण रस्ता न खोदता ठेकेदाराने त्याच रस्त्यावर काँक्रिटीकरणाचे काम केले. रस्त्याच्या साईडपट्ट्या मुरूम टाकून भरण्याऐवजी चक्क रस्त्याच्या गटारातील माती काढून भरल्या आहेत.

रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराला आम्ही मुरूम टाकून साईडपट्ट्या भरा असे सांगितले. परंतु, रस्त्याच्या कडेची माती काढून साईडपट्ट्या भरल्या जात आहेत. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे कोयेतील सामाजिक कार्यकर्ते पप्पू राळे यांनी सांगितले.

माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी रस्त्याचे कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला. परंतु, या रस्त्याचे काम दर्जाहीन असल्याचा आरोप राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष जयसिंग दरेकर यांनी केला.



### साईडपट्ट्यांच्या कामावर नागरिकांची नाराजी

» कोये ते धामणे रस्त्याच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामात साईडपट्ट्या मुरूमाऐवजी माती टाकून भरल्या जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ते पप्पू राळे यांनी या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करत ठेकेदाराने योग्य पद्धतीने काम करावे, अशी मागणी केली. रस्त्याच्या कडेला असलेली माती काढून तीच साईडपट्ट्यांमध्ये वापरली जात असल्याने भविष्यात रस्ता खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी पीएमआरडीएकडून या कामाची तातडीने चौकशी करून दर्जेदार कामाची खात्री करण्याची मागणी केली आहे.

### ४५ कोटींच्या रस्ते प्रकल्पांकडे लक्ष

» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) खेड तालुक्यातील विविध ग्रामीण भागांतील रस्त्यांच्या विकासासाठी सुमारे ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. धामणे फाटा ते कोये, कोहिंडे फाटा ते कडूसगाव, कडूसगाव ते किवळे, भोसे ते वडगाव घेनंद आणि किवळे ते आंबेठाण या प्रमुख मार्गांचा यात समावेश आहे. ग्रामीण भागातील वाहतूक सुविधा सुधारण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी हे प्रकल्प महत्त्वाचे मानले जात आहेत. या रस्त्यांमुळे परिसरातील संपर्कव्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### दर्जेदार रस्त्यांसाठी मागणी जोरात

» धामणे फाटा ते कोये मार्गाच्या कामावरून परिसरात राजकीय आणि सामाजिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष जयसिंग दरेकर यांनी रस्त्याचे काम दर्जाहीन होत असल्याचा आरोप करत संबंधित यंत्रणेकडे कारवाईची मागणी केली. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी या रस्त्यांसाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र, प्रत्यक्ष कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. ग्रामीण भागातील महत्त्वाच्या रस्त्यांचे काम मजबूत आणि टिकाऊ व्हावे, अशी अपेक्षा स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# बाणेर–पाषाण–सूस उड्डाणपुलावर पादचाऱ्यांचा जीवघेणा प्रवास; स्कायवॉकची मागणी तीव्र


## जिने आणि स्कायवॉक नसल्याने नागरिकांना महामार्ग ओलांडताना प्रचंड धोका; प्रशासनावर तीव्र नाराजी

**पुणे | प्रतिनिधी**

पाषाण आणि सूस या भागांना जोडणाऱ्या राजमाता जिजाऊ उड्डाणपुलामुळे वाहनांची वाहतूक तर सुरळीत झाली. मात्र, पादचारी नागरिकांच्या नशिबी असलेली पायपीट आणि जीवघेणा प्रवास अद्याप संपलेला नाही. महामार्गाच्या दोन्ही बाजूंना ये-जा करण्यासाठी पुलावर जिने नाहीत.

तसेच, या ठिकाणी महामार्ग पार करणाऱ्या पादचाऱ्यांसाठी स्काय वॉकही करण्यात आला नसल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून महामार्ग ओलांडावा लागत आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे अपघाताची वाट पाहताय का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक विचारत आहेत.

महामार्गाच्या पलीकडे आपल्या दैनंदिन कामासाठी जाणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या ठिकाणी महामार्गाच्या अलीकडे व पलीकडे दोन्हींकडे मोठमोठ्या कंपन्या झाल्या आहेत. अनेक कर्मचारी वर्ग आपला जीव मुठीत धरून दररोज महामार्ग पार करतो. त्यामुळे एक तर पुलाला जिने करण्यात यावेत किंवा महामार्गावर पादचाऱ्यांसाठी स्काय वॉक करण्यात यावा, अशी मागणी या ठिकाणी जोर धरू लागली आहे.



### उड्डाणपुलावर पादचाऱ्यांचा जीवघेणा प्रवास

» वेगवान वाहनांच्या गर्दीतून जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडणे.

» उड्डाणपुलावरून तब्बल एक ते सव्वा किलोमीटरचा वळसा घालून पायपीट करणे. यात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि शालेय विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत.

“ सूस खिंड महामार्गालगत आणि कंपन्या, वाहनांचे शोरूम आहेत. यामुळे या ठिकाणी कामाला येणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त आहे. बसणे व इतर वाहनांनी येणाऱ्यांना दररोज धोकादायक पद्धतीने येथे महामार्ग पार करावा लागतो. आमची कंपनी ही या ठिकाणी असून, अनेक कर्मचारी जीव मुठीत घेऊन दररोज महामार्ग पार करतात. शेकडो नागरिक दररोज येथे ये-जा करत असल्यामुळे एखादा अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने येथे स्काय वॉक किंवा उड्डाणपुलाला पायऱ्या कराव्यात.

- राहुल रणपिसे, संचालक,
दास एअरकॉन प्रा. लि. कंपनी